☎- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

नियंत्रण कक्ष ☎ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट / 382 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 08 / 10 / 2025

# शहर वाहतूक शाखा वजिराबाद व इतवारा यांची अवैध प्रवाशी वाहतूक, विना वाहन परवाना चालणारी वाहने व फटाका बुलेट यांचेवरती धडक कारवाई करून 2,91,600 /—रूपयाचा दंड आकारण्यात आला..

**मा. श्री. अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी शहरात वाढत असलेली ट्राफिक समस्या अटोक्यात आणनेसाठी शहरात चालणारी अवैध प्रवाशी वाहतूक तसेच विना परवाना/ परमिट चालणारे वाहणे, भरधाव वेगाने चालणारी वाहने, फटाका बुलेट व फळांचे गाडयाचे रस्त्यावरील अतिक्रमण यांचेवरती कार्यवाही करण्याची मोहीम राबविणे बाबत शहर वाहतूक शाखा वजिराबाद व इतवारा यांना आदेशीत केले होते.

त्या अनुषंगाने दिनांक 07.10.2025 रोजी प्रभारी अधिकारी श्री **साहेबराव गुट्टे,** पोलीस निरीक्षक, शहर वाहतूक शाखा, वजिराबाद यांनी सिटीबी स्टाफ व दंगल नियंत्रण पथकातील पोलीस अंमलदार यांचे समवेत नांदेड शहरातील वजिराबाद चौक,महाविर चौक,रेल्वे स्टेशन,कलामंदीर व इतर भागात युनिफॉर्म परिधान न केलेले ॲटोरिक्षा चालका विरूध्द व वाहतुक नियंमाचे उल्लघण करणाऱ्यांवर व वाहनावर दंडात्मक कार्यवाही करून तसेच फटाका बुलेट, अवैध प्रवाशी वाहतूक व इतर केसेस अशा **एकुण 130 केसेस करून एकुण 1,59,550 /— रूपयाचा दंड आकारण्यात आला.**

तसेच दिनांक 07.10.2025 रोजी प्रभारी अधिकारी श्री **जगन्नाथ पवार,** पोलीस निरीक्षक, शहर वाहतूक शाखा, इतवारा यांनी स्टाफ व दंगल नियंत्रण पथकातील पोलीस अंमलदार यांचे समवेत देगलूर नाका, जुना मोंढा व ढवळे कॉर्नर या ठिकाणी वाहणाची कागदपत्रे तपासणी केली. सोबतच ऑटो चालकांना गणवेश परिधान करणेबाबत सुचना दिल्या. जुना मोंढा येथील वाहतूकीस अडथळा निर्माण होणारे फळांच्या गाडयांवर कार्यवाही करण्यात आली. तसेच फटाका बुलेट, अवैध प्रवाशी वाहतूक व इतर केसेस अशा **एकुण 126 केसेस करून एकुण 1,32,050 /— रूपयाचा दंड आकारण्यात आला.**

शहर वाहतूक शाखा वजिराबाद व इतवारा यांनी नांदेड शहरात मोहीम राबवुन फटाका बुलेट, अवैध प्रवाशी वाहतूक, वाहतुकीस अडथळा करणारे फळांच्या गाडयांवर, विना परवाना/परमिट चालणारे वाहणे, भरधाव वेगाने चालणारी वाहने, विदाउट युनिफॉर्म यांचेवर एक्त्रीत कार्यवाही करून एकुण 2,91,600 /— रू चा दंड आकारण्यात आला आहे.

सदरची कारवाई **मा. श्री अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक नांदेड, **मा. श्री सुरज गुरव**, अपर पोलीस अधीक्षक नांदेड, यांचे मार्गदर्शनाखाली अधीकारी/अंमलदार शहर वाहतूक शाखा वजिराबाद, इतवारा, दंगल नियंत्रण पथकातील पोलीस अंमलदार यांनी केली आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड